**प्रेसनोट**

अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
दिनांक : ०४/०२/२०२५

| | | |
|---|---|---|
| १ | युनिट चे नाव | अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती घटक,अमरावती. |
| २ | आरोपीचे नाव, हुददा व कार्यालयाचा पत्ता | श्री. मोतीराम माणिकराव ढोरे, वय ४२ वर्षे, पद – सहाय्यक (वर्ग–३), एम.आय.डी.सी प्रादेशिक कार्यालय, अमरावती रा. एमआयडीसी, शासकीय निवासस्थान क्र.१०२, जुना बायपास रोड, अमरावती. |
| ३ | अपराध घडला दिनांक व वेळ | ०४/०२/२०२५ चे १६.०० ते १६.२५ वा.दरम्यान |
| ४ | मागणी केली लाच रक्कम | २५,०००/–रुपये |
| ५ | तडजोडीअंती मागणी केलेली लाच रक्कम | २०,०००/– रुपये |
| ६ | स्विकारलेली लाच रक्कम | १०,०००/–रुपये |
| ७ | घटनास्थळ | एम.आय.डी.सी प्रादेशिक कार्यालय, अमरावती. |

**थोडक्यात हकिगत** :– यातील तक्रारदार यांच्या बहीणीच्या नावावर एमआयडीसी, अमरावती अंतर्गत नांदगाव पेठ येथे प्लॉट आहे. तक्रारदार यांचे वडीलांना तोंडाचा कॅन्सर असल्याने वैदयकिय उपचाराकरीता पैशांची आवश्यकता असल्याने सदरचा प्लॉट सरेंडर करुन त्याची रक्कम ९,३०,०००/– रू. लवकर मिळवुन देण्याकरीता एमआयडीसी अमरावती येथील आलोसे श्री. ढोरे यांनी २५,०००/– रुपये लाचेची मागणी केल्याबाबत दिनांक ३१/०१/२०२५ रोजी ला.प्र.वि. अमरावती घटक कार्यालय येथे तक्रार दिली होती.

सदर तक्रारीवरुन दिनांक ०३/०२/२०२५ रोजी व दिनांक ०४/०२/२०२५ रोजी पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान त्यातील नमुद आलोसे श्री. ढोरे यांनी यापूर्वी ५,०००/– स्विकारल्याचे मान्य करून उर्वरीत रक्कमेपैकी १०,०००/– रुपये आता आणून दया, व बाकीचे काम पुर्ण झाल्यावर १०,०००/– रुपये दे, असे म्हणून लाच रक्कम स्विकारण्याची समंती दर्शविली.

दिनांक ०४/०२/२०२५ रोजी पंचासमक्ष आयोजित करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान आलोसे श्री. ढोरे यांनी सदर प्लॉटची फाईल लवकरात लवकर काढुन देण्यासाठी १०,०००/– रुपये लाच रक्कमेचा पहिला हप्ता स्विकारल्याने त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. नमुद आरोपीविरुध्द पो.स्टे. राजापेठ, अमरावती शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा.श्री. मारुती जगताप, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, मा.श्री. सचिंद्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, मा.श्री. मंगेश मोहोड, पोलीस उपअधिक्षक, ला.प्र.वि., अमरावती, यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पो.नि. भारत जाधव, तसेच पो.नि. केतन मांजरे, पो.नि. संतोष तागड, पो.हवा. प्रमोद रायपुरे, पोलीस अंमलदार उपेंद्र थोरात, युवराज राठोड, आशिष जांभोळे, शैलेश कडु, पोउपनि सतिष किटुकले यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाचप्रकारे भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

**संपर्क: अॅन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती**
**ऑफीस फोन नं.०७२१–२५५२३५५,टोल फ्रि नंबर–१०६४**

Bjadhav 04/02/25

**(भारत जाधव)**
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती.
मो.न. ८१०८५५८८१२.